प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दिनांक - १६ जुलै २०२०**

## टाळेबंदीच्या काळातही सिडको वसाहत विभागाच्या ऑनलाइन सेवा अविरतपणे सुरू

## नागरिकांना वसाहत विभागाच्या सर्व सेवा घरबसल्या सुलभतेने प्राप्त

कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या सुमारे चार महिन्यांच्या कालावधीतही सिडकोच्या वसाहत विभागातर्फे देण्यात येणाऱ्या ऑनलाइन सेवा या अविरतपणे सुरू असून सध्याच्या काहीशा प्रतिकूल परिस्थितीतही नागरिकांना या सेवांचा लाभ घेणे शक्य झाले आहे.

**श्री. लोकेश चंद्र**, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी दिलेल्या निर्देशांनुसार दि. १ नोव्हेंबर २०१९ पासून सर्व ऑफलाइन नागरिक सुविधा केंद्रे (CFC) बंद करण्यात आली. त्यानंतर वसाहत विभागाच्या सेवा प्राप्त करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या प्रती अपलोड करून केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज आणि शुल्क स्वीकारण्यास सुरूवात झाली. तसेच डिजिटल स्वाक्षरी केलेल्या सर्व प्रकारच्या परवानग्या/ना-हरकत प्रमाणपत्रे ही अर्जदारांच्या ई-मेलवर पाठविण्यास सुरूवात झाली. याशिवाय, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी अर्जांचे विकेंद्रीकरण होऊन अर्जदारांना या सेवा लवकरात लवकर मिळाव्यात याकरिता प्रत्येक नोडमध्ये विभागीय अधिकारी नेमण्याबाबतचे निर्देश दिले.

२४ मार्च २०२० रोजी टाळेबंदीची घोषणा करण्यात आल्यानंतर वसाहत विभागातील कर्मचाऱ्यांना घरून काम करण्यासाठी आवश्यक ते तांत्रिक सहाय्य मिळेल याबाबतची खबरदारी सिडकोकडून घेण्यात आली. यामुळे टाळेबंदीच्या काळातही वसाहत विभागाच्या ऑनलाइन सेवा अविरतपणे सुरू राहू शकल्या. २३ मार्च २०२० ते १६ जुलै २०२० या कालावधीत वसाहत विभागाने १४१६ ऑनलाइन अर्जांवर प्रक्रिया करण्याबरोबरच अनेक अर्जदारांना हस्तांतरण ना-हरकत प्रमाणपत्र, तारण ना-हरकत प्रमाणपत्र, भाडेपट्टा, अन्य प्रकारच्या परवानग्या मंजूर केल्या.

टाळेबंदीच्या काळात नागरिकांना काही शासकीय सेवा मिळणे सुलभ व्हावे यासाठी वसाहत विभागाच्या सर्व सेवा या ऑनलाइन प्रक्रियेद्वारे पुरविण्याचा श्री. लोकेश चंद्र, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी घेतलेला निर्णय सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरला आहे. यामुळे नवी मुंबईतील नागरिकांना घरबसल्या सुरक्षितपणे या सेवांचा लाभ घेणे शक्य झाले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

संपादक महोदय .मा,

ही विनंती ,वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे.

**सिडको ,जनसंपर्क विभाग**